महिन्याचा विचार

**(उत्तरार्ध) – स्वामी शिवानंद सरस्वती (८ सप्टेंबर)**

गुरूदेवांसारखे एखादे व्यक्तिमत्वच प्राणिमात्रांमधील व्यथांवर उपाय योजना करू शकतात. माणसा–माणसांमध्ये फरक असला तरीही सगळ्यांना जोडणारे तत्व शेवटी एकच असते. तेच सगळ्यांना जोडून एका पातळीवर आणू शकते. जरी आपल्या भाषा वेगळ्या असल्या, आपली आराध्य दैवते निरनिराळी असली, आपले खाद्य वेगळे असले तरी आपला ''आत्मा''एकच असतो. माझा आणि तुमचा आत्मा एकच असतो आणि आत्म्याची भाषा एकच असते. भलेही मी भारतीय भाषा बोलत असेन, आणि इंग्रजी, कोणी फ्रेंच, तर कोणी जर्मन, मात्र त्या साऱ्यांचा मतितार्थ शेवटी एकच असतो. पुरूष, स्त्री, बालक साऱ्यांच्या आत्म्याची भाषा एक असते. व्यक्तिमत्वाचे पैलू बदलतील पण आत्मा तोच असतो. मानवातील एकीसाठी हे सामायिक व्यासपीठ असते.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट! ऑल इंडिया रेडीओचे एक पदाधिकारी माझ्याकडे येऊन म्हणाले – '' देशाच्या उभारणीत धर्माचे स्थान'' या विषयावर तुमचा संदेश द्या. ''मला प्रश्न पडला'' – हे म्हणजे आत्मा आणि शरीर यांचे नाते यावर भाष्य करण्या सारखे झाले! आत्मा नसेल तर शरीराच्या अस्तित्वाला अर्थ तो काय? तुमच्या व्यक्तिमत्वातील आत्मा वगळा, आणि बघा काय मागे उरते ते ! क्षणात तुमचे तुकडे होतील.''

हे कसे होईल, हा प्रश्न तुम्हाला पडेल. आत्मा काही आपल्या शरीरात एखाद्या गुरूत्वमध्यासारखा स्थिर नसतो. हे आत्मतत्व शब्दांमध्ये सामावणारे नसते. विद्युत उर्जेसारखे आत्मतत्व असते. विद्युत शक्ती डोळ्यांना दिसत नाही, पण म्हणून तिचे अस्तित्व नाकारता येत नाही. ती जाणवते कारण ती अदृश्य रूपात असते. ती प्रत्येक निर्मितीमध्ये समाविष्ट असते. प्रत्येक अणूत असते. तसेच आत्मा प्रत्येक प्राणी मात्रात, चराचरात असतो.

शरीराच्या कोपऱ्यात एखाद्या किड्यासारखा किंवा एखाद्या पात्रात ठेवलेल्या दिव्यासारखा तो स्थानबद्ध नसतो. असं मानणं हाच बालिशपणा होईल. शरीरातील पेशींना एकत्र बांधणारा, त्यांना ''देहस्वरूप'' देणारा एक घटक म्हणजे आत्मा! मनातील विचारांना दृश्य स्वरूप देतो तो आत्मा ! ज्याला तुम्ही स्वत:चं असं म्हणू शकाल त्यांच्यात समन्वयाचे काम करतो तो आत्मा! म्हणूनच आत्मा काढून घेतला तर आपण उरणार नाही. ज्याला तुम्ही 'मी'' म्हणता तोच प्रत्यक्षात आत्मा असतो. तुमच्यापेक्षा त्याला वेगळं असं अस्तित्व नसतं. तुम्ही तुमचे जे काही आहात, तो प्रत्यक्षात आत्मा असतो. तुम्हाला वेगळा आत्मा नसतो, तुम्हीच आत्मस्वरूप आहात. माझ्या आतमध्ये ''आत्मा'' वास करतो असे म्हणू नका. तुम्ही म्हणजेच आत्मा आणि आत्मा म्हणजेच तुम्ही!

तेव्हा आत्म्याकडे दुर्लक्ष म्हणजेच स्वत:ला नाकारणे! मग आयुष्य ते काय राहील?

धर्म आयुष्यातून काढून टाकणे म्हणजेच आयुष्य आयुष्यातून काढून टाकणे! ''धर्म हे आत्म्याचं शास्त्र आहे.'' हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम हे धर्म नाहीत. सामाजिक संदर्भांसाठी धर्माने धारण केलेले ते एक स्वरूप आहे. धर्म म्हणजे आत्म्याचे वैशिष्ट्य आहे – बाह्यवर्तनाचे आणि कर्तृत्वाचे! तुम्ही जर आत्मस्वरूप धारण केले तर धर्म तुमचे बाह्य

वर्तन ठरतो. तुमच्या कर्तृत्वाची चौकट बनतो. धर्म मग तुमच्या आत्म्याचा हुंकार बनतो. तेव्हा धर्माविना जगण्याचा विचारच मुळी अविश्वसनीय आहे. धर्मा विना जीवन ही संकल्पनाच अशक्य आणि अतर्क्य आहे.

मात्र मनाला हे पटवून देणं अवघड आहे. अध्यात्म, देव धर्म, समाज या साऱ्यांबाबत आपल्या मनात गोंधळ असतो. हे सारं दुरूस्त करण्यासाठीच स्वामी शिवानंद सरस्वतींसारख्या विभूतींचे जन्म असतात. त्यांचा धर्म आणि त्यांचे तत्वज्ञान हे मानव जातीचे तत्वज्ञान आहे. ते हिंदूत्वाचा प्रसार करण्यासाठी या भूतलावर आले नव्हते. त्यांचा स्वत:चा असा कोणताही धर्म नव्हता. ते देवत्वाचे प्रतिनिधी होते. देवही अमानवी अस्तित्वाची संकल्पना आहे. त्या संकल्पनेचे स्वामीजी मानवी रूप होते.

**– स्वामी कृष्णानंद सरस्वती**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

* जानेवारी २०२० चा सत्संग श्री. लष्करे यांच्या यांच्या घरी दि. ११ रोजी संपन्न झाला.
* ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा वर्षारंभ अंक परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्‍व, धायरी,
पुणे ४११०६८, मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १५/अंक २
फेब्रुवारी २०२०

Do not give Room for lethargy. Be always Vigilant to destroy the anti - Currents Material life. Remember the Lord at all times. Let your thoughts soar high, to sublime heights of divine splendour. Let not the mind be immersed in worldliness. Have perfect confidence in the Lord, although it is not easy to comprehend him. Happy is he who has controlled all desires. Happy is he who is endowed with self restraints, courage, mercy & humility. Happy is he who has found his object & quest.

- Swami Sivanand